उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियतकालीक बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली-२०२३/प्र.क्र.७७/उद्योग-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २५ मे, २०२३.

वाचा -
१) महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
२) शासन निर्णय क्र.ईएसटी-३४१४/१५२/प्र.क्र.१८/उद्योग-३, दि.२२.०४.२०१४
३) शासन निर्णय क्र.ईएसटी-३४१५/प्र.क्र.०१/उद्योग-३, दि.०५.०५.२०१५

शासन आदेश-

उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिक्षकीय उद्योग अधिकारी, उद्योग उपसंचालक या गट-अ संवर्गातील खालील तक्त्यात नमूद अधिका-यांची उपरोक्त अ.क्र.१ येथील अधिनियमातील तरतूदीनुसार अ.क्र.३ येथील नमूद सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने नियतकालीक बदली करण्यात येत आहे.

संवर्ग-उद्योग उपसंचालक, गट अ

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	सध्याचे कार्यरत ठिकाण	बदलीनंतर पदस्थापनेचे ठिकाण	शेरा
१	२	३	४	५
१	श्री.प्र.द.हणबर, उद्योग उप संचालक	जिल्हा उद्योग केंद्र लातूर	जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी	श्रीमती वि.ध.कुलकर्णी यांच्या प्रस्तावित बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर

२. वरील परिशिष्ठातील रकाना क्र. ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित बदली झाल्यानंतर या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

३. "महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५" मधील कलम ४ व कलम ६ च्या परंतुकामधील तरतूदीन्वये सक्षम प्राधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन या बदल्या करण्यात येत आहेत.

४. उपरोक्त नमूद अधिका-यांनी उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमूद बाबीची पूर्तता झाल्यानंतर अनुज्ञेय असलेल्या पदग्रहण अवधीमध्ये बदलीच्या ठिकाणी रुजु व्हावे. अन्यथा या पदग्रहण अवधीच्या पदावर रुजु न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०५२५१९४२२१३७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHASHANK TUKARAM CHAVAN

Digitally signed by SHASHANK TUKARAM CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7dd1791f8c7f2d8cbabbae6c3c11ac3d4fe93ccab49daf36ff24dacd585e2276, pseudonym=ECC424589A881E3E8CAB5C4F3152EABAEE38E22E, serialNumber=A089DF063F1FFA9C6E2D052DB3C26C5B1ECE40048A4A7D39615BEE66D9E2053D, cn=SHASHANK TUKARAM CHAVAN
Date: 2023.05.26 11:04:53 +05'30'

(शशांक चव्हाण)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
२. मा. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. विकास आयुक्त (उद्योग),उद्योग संचालनालय,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई ४०० ०३२
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१,मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२,नागपूर
६. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
८. संबंधित अधिकारी (उद्योग संचालनालयामार्फत)
९. निवडनस्ती/उद्योग-३.